# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२३ / श्रावण ११, १९४५ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) सहकार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | |
| **(३) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(४) कृषी मंत्री** | |
| **(५) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(६) इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(७) राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - १४**

----------------------------------

### किराट गाव (जि.पालघर) येथे मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी जमीन संपादित करताना झालेला गैरव्यवहार

**(१) * ६७२४९ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किराट (जि.पालघर) गावातील सर्वे क्र.३३५ मधील ९ हजार ८३५ चौ.मी. आणि सर्वे क्र.३३८ मधील २ हजार २४५ चौ.मी. क्षेत्र जमीन मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी संपादित करताना त्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन संपादन कामात बोगस अहवालाच्या आधारे तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने दुप्पट मोबदला घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किराट गावातील सर्वे क्र.३३५ मधील बाधित होणाऱ्या झाडांची व घरांची संख्या कृषी अधिकाऱ्यांच्या संगनमताने जास्त दाखवून बनावट अहवाल तयार करुन त्याचा रुपये ९५,२९,७७२/- इतका मोबदला घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे किराट ता.जि.पालघर येथील सर्व्हे नं.३३५ व ३३८ मधील खाजगी जमिनी मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी संपादित करण्यात येत आहे. या जमिनीच्या संपादन प्रक्रीयेवेळी गैरव्यवहार होत असल्याबाबत स्थानिक नागरीकांची जिल्हाधिकारी, पालघर आणि उप विभागीय अधिकारी, पालघर यांचेकडे दिनांक ०८.०५.२०२३ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी,

पालघर यांनी सखोल चौकशी करण्याकरीता अतिरीक्त जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली आहे. सदर चौकशी समिती मार्फत चौकशी चालु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे कोलवली, कोटीम, वाणगांव व चिंचणी (ता.डहाणू, जि.पालघर) गावातील शेतकऱ्यांच्या जमिनींच्या सातबारावरील कुळांची नावे कमी करण्यात येत असल्याबाबत**

**(२) * ७१००३ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोलवली, कोटीम, वाणगांव व चिंचणी (ता.डहाणू, जि.पालघर) या गावातील शेतकरी वडिलोपार्जित जमिनीवर शेती करीत असून सदर जमिनी ट्रस्टच्या माध्यमातून खाली करण्याच्या नोटिसा प्रशासनाने दिल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी हरजीवन चॅरिटेबल ट्रस्ट यांनी सातबारावरील कुळांची नावे कमी करण्यासाठी डहाणू तहसीलमध्ये दावा केला आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, शेतकऱ्यांकडे ५३/५४ च्या उताऱ्यावर संरक्षित कुळ म्हणून नोंद दाखल केलेली असताना देखील ट्रस्टच्या नावाचा आधार घेऊन खोटे दावे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
मौजे वाणगांव, ता. डहाणू, जि. पालघर येथील ७/१२ उताऱ्यावर इतर अधिकारात असलेली कुळांची नांवे कमी करण्यासाठी हरजीवन वासोनजी चॅरीटेबल ट्रस्ट तर्फे री. जितेंद्र जगदेवभाई बरोट यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७० ब प्रमाणे तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, डहाणू यांचेकडे दावा दाखल केलेला आहे.
(३), (४) व (५) सदर प्रकरणाच्या सुनावणीची कार्यवाही सुरू असून नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन व प्रकरणातील कागदपत्रे तपासून महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या प्रचलित तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्याची तजवीज आहे.

-----------------

**गडचिरोली (जि.गडचिरोली) मूरखळा शहराजवळील भागात शासनाने वाटप केलेल्या वनहक्काच्या जमिनीवर भूमाफियांनी कब्जा केल्याबाबत**

**(३) * ६९३९९ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली (जि.गडचिरोली) मूरखळा शहराजवळील भागात शासनामार्फत वाटप करण्यात आलेल्या वनहक्काच्या जमिनीवर भूमाफियांनी कब्जा केला असून त्यावर लेआऊट तयार करुन भूखंड विक्रीला काढल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शहरातील भूमाफियांनी सदरील जागा (सर्व्हे क्र.१०८ व १८९/२) मूळ मालकांकडून विकत घेत त्यावर प्लॉट पाडून विक्री सुरु केली तसेच सदरील जमिनीला लागून असलेल्या महसूल विभागाच्या ताब्यातील वनजमिनीवर या भूमाफियांनी कब्जा करुन त्यावर प्लॉट पाडले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणात वनविभागाने वर्षभरात महसूल विभागातील तहसीलदार ते विभागीय आयुक्त यांच्याशी पत्रव्यवहार करुन जमिनीची विक्री होत असल्याबाबत कळविले असूनही या विभागाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वन विभागाच्या जमिनीवर कब्जा करणाऱ्या भूमाफियांवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) सर्व्हे क्र.१०८ व १७९/२ येथील वनहक्कांच्या जमिनीवर कोणत्याही भूमाफियांनी कब्जा केलेला नसून, मुळ जमीन मालकांकडून भूमाफियांना जमीन विक्री करण्यात आलेली नाही. संबंधित वनहक्क धारकांनीच सदर जमिनीचे सपाटीकरण करुन ले-आऊट टाकल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु सदर भूखंडांची विक्री झाली नाही. तसेच सदर वनाच्या जमिनीस लागून असलेल्या कोणत्याही महसूली विभागाच्या वन जमिनीवर अतिक्रमण वा कब्जा करुन प्लॉट पाडले नसल्याचे आढळून आले आहे.
(३), (४) व (५) सदर बाब जिल्हाधिकारी गडचिरोली कार्यालयाचे निदर्शनास येताच दिनांक ०४.०८.२०२२ च्या पत्रानुसार मौका चौकशी अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांना कळविले असता, त्यांच्या दिनांक १०.०७.२०२३ च्या अहवालानुसार वनहक्क धारकांने उक्त जमिनीवर भूखंड पाडून विक्री करण्याकरिता सपाटीकरण केल्याचे निदर्शनास आले. वनहक्क धारकांचे नांव ७/१२ वर इतर हक्कात नमूद असल्याने त्याची विक्री करता येत नाही. स.क्र.१०८ व १७९/२ मधील वाटपाच्या जमिनीचे शर्तभंग झाल्याने वनहक्क पट्टे रद्द करण्याची शिफारस जिल्हाधिकारी, गडचिरोली कार्यालयास दिनांक ११.०७.२०२३ च्या पत्रान्वये प्राप्त झाली आहे. वन विभागाच्या जमिनीवर कोणत्याही अधिकाऱ्याने कब्जा केला नसल्याचे आढळून आल्याने अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. अहवालातील शिफारशींप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## कुंडेवहाळ (जि.रायगड) येथून मुंबईतील विकासकामाकरिता वाळू व खडीचा पुरवठा करणाऱ्या कंपनीकडून होत असलेला गैरव्यवहार

**(४) * ७०५०८ श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विकास कामांसाठी कुंडेवहाळ (जि.रायगड) आदि ठिकाणांहून ७५ टक्क्यांहून अधिक खडी आणि दगड मिश्रीत वाळूचा पुरवठा करण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दगडखाण मालकांकडून थेट खरेदीचा पर्याय असतानाही राज्य शासनाने विशिष्ट एका कंपनीबरोबर खडी व वाळू पुरवठा करण्यासंदर्भात करार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रतिटन खडीसाठी रुपये ३२५ व वाळूसाठी रुपये ४२५ हा दर असताना सदरहू कंपनीने प्रतिटन रुपये ६६० खडी व रुपये ७६० वाळू या दराने विक्री करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला असून यात शासनाच्या निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे कुंडेवहाळ ता.पनवेल येथील सरकार आकारी पड जमिनीमध्ये जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून सन २०१७ पासून महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार गौणखनिज खाणपट्टे / तात्पुरते गौणखनिज उत्खनन परवाने मंजूर करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने खाणपट्टाधारकास / परवानाधारकास गौणखनिज उत्खनन व वाहतुकीकरीता शासकीय रकमेचा भरणा केलेनंतर वाहतुक पासेस निर्गमित करण्यात येतात. मुंबई व इतर परिसरातील विकास कामांसाठी खडी/क्रशसॅण्ड इत्यादीच्या मागणीनुसार गौणखनिजाचा पुरवठा केला जातो.

-----------------

**हवेली (जि.पुणे) तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणीत होत असलेला गैरव्यवहार**

**(५) * ७०८८४ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.रविंद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक ४ व ९ येथे मोठ्या प्रमाणात दस्त नोंदणीसाठी गैरव्यवहार सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयात मध्यस्थांद्वारे मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करुन नागरिकांची फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गैरव्यवहार निबंधक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमत व सहभागाने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन सदर कार्यालयातील गैरव्यवहार रोखण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि ॲड.ज्ञानेश्वर एस.कराळे (देशमुख) यांनी दिनांक १३/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोंदणी महानिरीक्षक कार्यालय,पुणे यांना तक्रार केली आहे. उपरोक्त तक्रारीसंदर्भात नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने दिनांक २१/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे यांचेकडून संबंधित दुय्यम निबंधक यांच्या कार्यकालातील नोंदणीकृत दस्तांची तपासणी करुन स्पष्ट अहवाल मागविला असून तपासणीअंती दस्तांमध्ये अनियमितता आढळल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणीकृत दस्तांच्या तपासणीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. दुय्यम निबंधक, हवेली क्र. ४ व हवेली क्र. ९ या कार्यालयामधील मागील एक वर्षातील दस्त नोंदणीची तपासणी करण्यासाठी शासन पत्र दिनांक ०६ जुलै २०२३ च्या पत्रान्वये चौकशी समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

याशिवाय नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने पुणे शहरातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांमधील माहे मे, २०२३ व जून, २०२३ या कालावधीमध्ये नोंदणी झालेल्या दस्तांची तपासणी करण्यासाठी दिनांक २८ जून २०२३ रोजीच्या पत्रान्वये एकूण ९ तपासणी पथके गठीत केलेली असून सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर यांनी त्यांचेकडील आदेश दिनांक ११/०७/२०२३ अन्वये पुणे शहरातील सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.४ व हवेली क्र.९ कार्यालयांमध्ये सन २०२० पासून नोंदणी झालेल्या दस्तांची तपासणी करण्याचे नियोजन केलेले आहे व त्यानुसार तपासण्या करण्यात येणार आहेत. सदर तपासणीदरम्यान दस्त नोंदणीमध्ये अनियमितता आढळून आल्यास त्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हर्णे पाजपंढरी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) डोंगरामध्ये बेकायदेशीररित्या गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याबाबत

**(६) * ७०३१८ श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हर्णे पाजपंढरी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील डोंगरामध्ये मोठया प्रमाणात बेकायदेशीर व अनधिकृत दगड, माती आदी गौण खनिजांच्या उत्खननामुळे पायथ्याशी असलेल्या घरांना व धार्मिक स्थळाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१० मध्ये उक्त डोंगर कोसळून जिवितहानी झाल्यामुळे सदरहू उत्खनन त्वरीत थांबविण्याबाबत, समाजसेवक श्री.जहूरभाई झुंबडकर तसेच स्थानिकांनी तहसीलदार, दापोली व जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द स्थानिक प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध उत्खनन रोखण्यासंदर्भात तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील सं.नं.२७/४ व इतर क्षेत्रामध्ये अवैध उत्खनन होत असल्याची तक्रार/निवेदन दिनांक ०९.०५.२०२३ रोजी तहसिलदार, दापोली यांना प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, दापोली यांनी चौकशी केली असता सं.न.२७/४ मध्ये १० ते १२ वर्षापूर्वी उत्खनन केले असून सद्य:स्थितीमध्ये कोणतेही उत्खनन किंवा ब्लास्टिंग झाले नाही. तथापी, सं.न.२७/३अ/२ या क्षेत्रात विहित परवानगी घेवून २०० ब्रास मातीचे उत्खनन झाले आहे व सदर उत्खनन केलेली माती त्याच गटात भरावासाठी वापरलेली आहे.

-----------------

## ससूपाडा ते आचड (जि.पालघर) येथे आदिवासींच्या जागेवर अनधिकृत हॉटेल व अन्य बांधकाम केल्याबाबत

**(७) * ७०७१२ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ससूपाडा (ता.वसई, जि.पालघर) ते मौज आचड (ता.तलासरी) पर्यंत मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ या रस्त्याच्या दुतर्फा शासकीय जागेवर आणि आदिवासी बांधवांच्या जागेवर लहान-मोठे हॉटेल, ढाबे यांचे अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या हॉटेल्स व ढाब्यांमध्ये स्थानिक आदिवासी काम करीत असून त्यांना कामाचा व जागेचा पुरेसा मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर हॉटेल्स व ढाबे भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (FSSAI) तसेच शासनाच्या इतर आवश्यक परवानग्या न घेता बांधण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मुंबई-अहमदाबाद महामार्ग पालघर जिल्ह्यातील वसई, पालघर, डहाणू व तलासरी या तालुका हद्दी मधून जात आहे. पालघर तालुक्यातील आदिवासी तसेच शासनाच्या जमिनीवर अनधिकृत धाबा बांधकाम धारक यांना नोटीस बजावून एकूण ४३ अनधिकृत धाब्यांचे बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. तसेच डहाणू तालुक्यातील आदिवासी जागेत एकूण २२ धाब्यांची बांधकामे निदर्शनास आली असून सदर बांधकामे आदिवासी खातेदारांनी त्यांचे मालकी जागेत स्वत: बांधकाम केलेले आहेत. यापैकी १५ हॉटेल/धाब्यांना बिनशेती परवानगी देण्यात आली असून ०६ हॉटेल/धाब्यांवर दंडनिय कारवाई करण्यात आली आहे. ०१ हॉटेल बिनशेती परवानगीवर प्रलंबित आहे. हॉटेलमध्ये काम करणाऱ्या आदिवासी बांधवांना हॉटेल चालक मालकांकडून पुरेसे मानधन मिळत नसल्याबाबतची तक्रार कामगार उप आयुक्त पालघर यांचेकडे प्राप्त नाही. तसेच उक्त २२ आदिवासी खातेदारांपैकी मौजे विवळवेढे ता.डहाणू येथील स.नं.४०/१ एकूण क्षेत्र ३-७६.० हे.आर पैकी क्षेत्र १-२०.० हे.आर ही आदिवासी खातेदार श्री.जानू मंगळया कोरडा यांनी धारण केलेली जमीन दुसऱ्या आदिवासी व्यक्ती श्री.भागाभाई सोमाभाई गमार यांना शेती प्रयोजनार्थ विक्रीने हस्तांतरीत करण्यास जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १५.१२.२०१७ अन्वये परवानगी दिलेली आहे. जमिनीची रक्कम श्री.जानू मंगळया कोरडा यांना मिळाल्याची खात्री तहसिलदार, डहाणू यांनी केली आहे.

वसई तालुक्यातील एका बांधकामाबाबत निष्कसनाची कारवाई प्रस्तावित आहे. तसेच डहाणू वन विभागांतर्गत वन विभागाचे जागेत एकूण २६ अनधिकृत धाबा धारकांची संख्या असून २६ अतिक्रमण धारकांना अतिक्रमण हटविण्याबाबत नोटीस बजावण्यात आली असून १ प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वसई-विरार महानगरपालिका परिक्षेत्रात प्रभाग समिती “जी” वालिव यांचेमार्फत दिनांक २३.१०.२०१८ ते ०५.०७.२०२३ या कालावधीत १८० तसेच प्रभाग समिती “एफ” धानिव/पेल्हार यांचेमार्फत दिनांक ११.०५.२०२३ व दिनांक १२.०५.२०२३ रोजी ८६ अतिक्रमणे निष्कासनाबाबतची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच विनापरवाना अथवा विना नोंदणी व्यवसाय करणाऱ्या अन्न आस्थापना वर अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत कार्यवाही करण्यात येत असून एप्रिल, २०२२ ते मार्च, २०२३ या कालावधीमध्ये एकूण १३ व एप्रिल, २०२३ ते जून, २०२३ या कालावधीमध्ये एकूण ५ अन्न आस्थापनाची तपासणी करण्यात येऊन पैकी २ परवाने रद्द करण्यात आले आहेत. तसेच १६ आस्थापनांवर नोटीस पाठविण्यात आलेल्या असून तपासणीअंती कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## देवरी (जि.गोंदिया) येथील सामूहिक वनहक्क प्राप्त गावकऱ्यांच्या मागण्याबाबत

**(८) * ६९४६० श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी (जि.गोंदिया) येथील सामूहिक वनहक्क व वनातील गौण उपज यावर स्वामित्व हक्क प्राप्त असूनसुध्दा वन विभागाच्या अन्यायाच्या विरोधात वन हक्क प्राप्त गावकऱ्यांनी न्याय मागण्यासाठी आठ दिवसांपासून उपोषण सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपोषण व मागण्यांकडे वन विभाग तसेच शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन गावकऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत तसेच प्रस्तुत प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) वनविभागाने दिनांक २७.०५.२०२३ रोजी दक्षिण देवरी वनपरिक्षेत्रात विना वाहतुक परवाना तेंदूपत्ता वाहतुक करणारा ट्रक व ११२ तेंदू बोद जप्त करुन वनगुन्हा दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ट केले. वनविभागाच्या कायदेशीर कार्यवाहीचे अनुषंगाने वनविभागाविरोधात काही गावकऱ्यांनी उपोषण केले होते.

वनविभागाद्वारे सामुहिक वनहक्क वाटप वनक्षेत्रातील गौण वनोपज यावरील गावकऱ्याच्या स्वामित्व हक्काबाबत 'कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध निर्माण केलेला नाही. १४ गावांना सामुहिक वनहक्क प्राप्त नसतांना देखील त्यांचेद्वारा तेंदूपत्ता संकलन, व विक्री करण्यात आली आहे. २० ग्रामसभांद्वारा ग्रुप ऑफ ग्रामसभेच्या माध्यमातून सामुहिक वनहक्क क्षेत्रा व्यतिरिक्त उर्वरित वनक्षेत्रातून, वन्यजीव क्षेत्रातून व इतर शासकीय क्षेत्रातून तेंदूपत्ता संकलन केले आहे. सदर ग्रामसभांद्वारे मोठया प्रमाणात निर्धारित करुन दिलेल्या लक्षापेक्षा अतिरिक्त तेंदूपत्ता संकलन, संग्रहण व विक्री करुन रात्रीच्या वेळी अवैध वाहतुक परवाना तेंदूपत्ता वाहतुक केले आहे.

दिनांक २७/०५/२०२३ रोजी वनविभागाद्वारे देवरी वनपरिक्षेत्रात विना वाहतुक परवाना तेंदूपत्ता वाहतुक करणारा ट्रक व ११२ तेंदू बोद जप्त करुन वनगुन्हा दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ट केले आहे.

(२) उपोषण स्थळी माहे जून, २०२३ मध्ये आमगांव येथील आमदार श्री. सहसराम कोरोटे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन ते स्वतः उपोषणात सहभागी होऊन उपोषण स्थळी हजर होते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ताडोबा (जि.चंद्रपूर) येथील अंधारी व्याघ्र प्रकल्पात नियमबाह्य रिसॉर्टचे बांधकाम सुरू असल्याबाबत

**(९) * ७०२७६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा (जि.चंद्रपूर) येथे अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा बफर झोन हा इको सेन्सिटिव्ह असून तेथे मोठ्या प्रमाणात अनेक रिसोर्टचे बांधकाम नियबाह्यरित्या सुरु असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तपासणी करण्यासाठी महसूल विभागाच्या अखत्यारित एक समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे कोर क्षेत्रा सभोवतीचे ११०१.७७ चौ. कि.मी. क्षेत्र दिनांक ०५.०५.२०१० रोजीच्या अधिसूचनेन्वये बफर झोन म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक ०१.०१.२०१३ रोजी बफर वन विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. तदनंतर संपूर्ण बफर क्षेत्रासह उत्तरेकडील ब्रम्हपूरी प्रादेशिक विभागाचे आणि दक्षिणेकडील चंद्रपूर प्रादेशिक विभागाचे क्षेत्र मिळून एकूण १३४६.६१ चौ.कि.मी. क्षेत्र केंद्र शासनाच्या दिनांक ११.०९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र (Eco Sensitive Zone) म्हणून घोषित करण्यात आले आहे.

तथापि, सदर पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र घोषित होण्यापूर्वीच वन्यजीव विभागाच्या परवानगी शिवाय वनेत्तर क्षेत्रात रिसोर्ट सुरु केले असल्याचे निदर्शनास आले आहे. केंद्र शासनाच्या दिनांक ११.०९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे संवेदनशिल क्षेत्रातील रिसोर्ट व होमस्टेची तपासणी करण्याकरीता जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार सदर समितीमार्फत पर्यावरण संवेदनशिल क्षेत्रातील रिसोर्ट व होमस्टेची तपासणीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) येथे कृषी अधिकाऱ्यांनी मोजक्या शेतकऱ्यांनाच भात बियाणे वाटप केल्याबाबत

**(१०) * ६९३३३ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या माध्यमातून पारंपारिक शेतीबरोबर आधुनिक व प्रयोगशील शेतकरी व्हावा यासाठी अनेक नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत भात, नागली आणि तूर आदी वेगवेगळ्या प्रकारची बियाणे तालुका कृषी कार्यालयामार्फत शेतकऱ्यांना लागवडीसाठी दिली जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोखाडा (जि.पालघर) येथे सन २०२३ मध्ये कृषी कार्यालयात आलेले रत्नागिरी ७ हे भात बियाणे गाव-पाड्यातील केवळ ठराविक शेतकऱ्यांनाच दिल्याने अनेक शेतकरी या बियाण्यापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात मोखाडा येथील लोकसंख्या एक लाखाच्यावर असून येथील ९५ टक्के लोक शेती करीत असल्यामुळे निम्म्यापेक्षा जास्त लोकांना शेतीशी निगडीत योजनांचा लाभ मिळणे गरजेचे असताना योजना राबविणारे अधिकारी याबाबतची शेतकऱ्यांना माहिती करुन देत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मोखाडा कृषी कार्यालयात यंदा रत्नागिरी ७ हे बियाणे किती प्राप्त झाले व सदरहू बियाणे वाटप करताना कोणकोणते निकष लावण्यात आले व प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना बियाणे वाटप करण्यात आले आहे,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना बियाण्याचे नियमित वाटप करणे, योजनांची माहिती वेळीच करुन देण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके-कडधान्य अंतर्गत पीक पद्धतीवर आधारित (खरीप-भात नंतर रब्बी-हरभरा) पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन केले जाते. या योजनेअतंर्गत सन २०२३-२४ करिता पालघर जिल्ह्यास १०० हेक्टर चा लक्षांक देण्यात आला होता. त्यापैकी मोखाडा तालुक्यास १४ हेक्टर लक्षांक निर्धारित केला होता. लक्षांकाच्या १४ हेक्टर मर्यादेत ५.५० क्विंटल भात पिकाचे रत्नागीरी ७ या वाणाचे बियाणे महाबीज कडून प्राप्त झाले होते ते एकुण ३६ शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकासाठी वितरीत करण्यात आले आहे. प्राप्त मर्यादित लक्षांकाच्या आधारे कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली.

कृषि विभागाकडून विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रत्यक्ष भेटीद्वारे तसेच विविध माध्यमांतून योजनांची प्रचार प्रसिद्धी करण्यात येते.

सदर घटकाकरिता शेतकऱ्यांकडून महा डीबीटी पोर्टल वर ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येतात व त्याची ऑनलाईन सोडत काढली जाते. तसेच प्राप्त लक्षांकानुसार अर्ज प्राप्त न झाल्यास स्थानिक रित्या ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागवून सोडत काढून कार्यक्रमाची अमंलबजावणी केली जाते.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मोहने (ता. कल्याण, जि.ठाणे) येथे गोदरेज समुहाकडून होत असलेले अवैध गौण खनिज उत्खनन

**(११)** * **७०८९८ श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोहने (ता. कल्याण, जि.ठाणे) येथील उल्हासनदी पुलानजिक गोदरेज समूहाने औद्योगिक विभागात निवासी व अनिवासी वापराकरिता मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरु केले असल्याचे दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बांधकामासाठी महसूल विभागाने गोदरेज समूहास २०० ब्रास गौण खनिज उत्खननाची परवानगी दिली असतांना गोदरेज समूहाने १६४८८ ब्रास नियमबाह्य उत्खनन केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नियमबाह्य उत्खननामुळे शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) विकासक यांच्याकडुन मौजे वडवली ता. कल्याण येथील स.नं.५४/ब/१ क्षेत्र १४-००-०० आर चौ.मी., स.नं./हि.नं.५४/ब/२ क्षेत्र ७८६-८७-०० आर चौ.मी.,स.नं./हि.नं.५४/ब/३ क्षेत्र ३-००-०० आर.चौ.मी., सं.नं./हि.नं. ५२/१ क्षेत्र ०-०४-३० हे. आर. या मिळकतीत एकूण १६५३१ ब्रास उत्खनन व भराव केला असलेचे निदर्शनास आले. त्यापैकी २००० ब्रास गौणखनिज वाहतूक परवानगी घेतली आहे, ७७०४ ब्रास गौणखनिज हे विकास परवानगी घेतलेल्या क्षेत्रामध्ये भराव आहे. तर उर्वरित ६८२७ ब्रास गौणखनिज भराव हा ना विकास परवानगी क्षेत्रामध्ये आहे. तहसिलदार,

कल्याण यांनी ६८२७ ब्रास अनधिकृत भरावाच्या अनुषंगाने दिनांक २७.०६.२०२३ रोजी रू.७,२३,६६,२००/- इतक्या रकमेची दंडनीय आदेश पारित केले आहे.

-----------------

## नाशिक भूमी अभिलेख कार्यालयाकडून शेतकऱ्यांच्या जमिनींची मोजणी करताना होत असलेली अडवणूक

**(१२) * ६८५४९ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील भूमी अभिलेख कार्यालयात जमिनींची मोजणी करताना खातेदारांची अडवणूक होत असल्यामुळे मखमलाबाद नाशिक येथील शेतकऱ्यांनी निवेदनाव्दारे तक्रार केली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयामार्फत सिटी सर्वे लागू करताना जमिनीची मोजणी आणि स्वतंत्र पोटहिस्से असतानाही सर्व हिस्सा एकत्र करुन एकच नंबर देणे, परंतु व्यावसायिकांचे स्वतंत्र हिस्सा नसताना त्यांचे मात्र १ व २ गुंठा असे हिस्से करुन देणे तसेच ज्या प्रकरणांमध्ये हक्कसोड पत्रक दिले असेल त्यांचे नाव दफ्तरी कमी केल्यानंतरही शेतकऱ्यांना स्वतंत्रपणे अपिल करण्यास भाग पाडणे असे अनेक गैरप्रकार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन गैरप्रकारांना आळा घालण्याबाबत तसेच यासंदर्भात संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, नाशिक यांचे कार्यक्षेत्रातील मखमलाबाद या गावाला नगर भूमापन योजना अंमलात आली असून सदर योजना अंमलात येताना नकाशा व क्षेत्रांत तफावत झालेली असल्याने त्याबाबत मौजे मखमलाबाद येथील शेतकऱ्यांनी दिनांक ०४.०५.२०२३ रोजी तक्रारी अर्ज सादर केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मौजे मखमलाबाद येथे विस्तारीत क्षेत्राचे नगर भूमापनाचे काम सन २०१८ मध्ये पुर्ण केले आहे. मखमलाबाद या गावामध्ये एकूण १०,५१९ एवढया मिळकती आहेत. या गावाचे परिरक्षणाचे काम दिनांक ०६/०१/२०२३ पासून सुरु असून आजपर्यंत एकूण ७७ तक्रारी प्राप्त आहेत. सदर तक्रारींबाबत अभिलेखात पडताळणी केली असता सदर तक्रारींमध्ये तथ्य असल्याचे आढळून आले आहे. सदर तक्रारींचे अनुषंगाने दप्तर तपासणीचे काम चालु आहे. सदर तपासणी काम पुर्ण झाल्यानंतर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर जबाबदारी निश्चित करणेत येत आहे. नगर भूमापनात मुळ चौकशी समयी झालेल्या चुकांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २५७ नुसार दुरूस्तीची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मौजे घेरा सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) येथील आनंदवन सहकारी संस्थेकडून आदिवासींच्या जमिनीवर अनधिकृत बांधकामे सुरु असल्याबाबत

**(१३) * ६६२४७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घेरा सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सांबरेवाडी व थोपटेवाडी गावातील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी आनंदवन सहकारी संस्थेकडून बेकायेदशीररित्या ताब्यात घेतल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू संस्थेमार्फत ग्रामपंचायत व संबंधित विभागाच्या विनापरवानगी शेतजमिनींचे प्लॉटींग करुन त्यावर अनधिकृतरित्या २००० स्क्वे. फूट व अधिकचे बंगले तसेच फार्म हाऊसची बांधकामे सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बांधकामे टेकड्या व डोंगर फोडून सुरु असून नोंदणी व मुद्रांक शुल्क तसेच उत्खननापोटी रॉयल्टीही भरणा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना योग्य मोबदला देणे, अवैध बांधकाम रोखणे तसेच महसूलीची वसूली करणे व संबंधित दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही,
मौजे घेरा सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामधील सांबरेवाडी व थोपटेवाडी येथील आंनदवन गृहरचना संस्था यांचे मालकीचे ७/१२ उतारे पाहिले असता सदर जमिनीवरती सदर संस्थेने ही जमीन खरेदी करणेपूर्वी आदिवासी समाजाची मालकी किंवा वहिवाट असल्याचे आढळून येत नाही.
(२) हे खरे आहे,
महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार सांबरेवाडी व थोपटेवाडी ही गावे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे या नियोजन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात असल्याने संबंधित विभागास अनधिकृत बांधकामावरती कार्यवाही करण्याबाबत कळविणेत आले आहे.
(३) हे खरे आहे,
आनंदवन गृहरचना संस्थेच्या मालकीच्या जमिनीवर अवैधरित्या टेकड्या/डोंगर फोडून अनधिकृत अकृषक वापर करून बांधकामे करताना गौण खनिज विभागाची कोणतीही परवानगी घेतली असल्याची किंवा रॉयल्टी रक्कम शासन जमा केल्याची बाब आढळून येत नाही. उत्खननाची चौकशी करून कारवाई करण्याबाबत तहसिलदार हवेली यांना कळविले आहे.
(४) व (५) आनंदवन गृहरचना संस्थेने ही जमीन खरेदी करणेपूर्वी आदिवासी समाजाची मालकी किंवा वहिवाट असल्याचे आढळून येत नसल्याने शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत प्रश्न उद्भवत नाही. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार सांबरेवाडी व थोपटेवाडी ही गावे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे या नियोजन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने अवैध बांधकामाबाबत उचित कारवाई करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## मांडवी खुर्द, मांडवी बु. गोगलवाडी, खडळवाडी (ता.हवेली, जि.पुणे) हद्दीमध्ये बेकायदेशीररित्या उत्खनन सुरु असल्याबाबत

**(१४) * ६६२७५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील मांडवी खुर्द, मांडवी बु. येथील गोगलवाडी, खडकवाडी, सांगरून, बहुली हद्दीमध्ये व्यावसायिक प्रकल्पांकरिता विनापरवानग्या व बेकायदेशीररित्या मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे पर्यावरणास होत असलेल्या हानीबाबत अनेक तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त होऊनही त्याकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरित्या होणारे उत्खनन रोखणे, महसुलाची वसूली करण्याबाबत तसेच यासंदर्भात संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) हवेली तालुक्यातील मौजे मांडवी (खु), मांडवी (बु) ची गोगलवाडी, खडकवाडी, सांगरून व बहुली पैकी खडकवाडी येथील ग.नं.२४८, २४५, २४४, २४६, ४०३, ४०२, ४०७, ४०६, ४०८, २४३, ४११ व १४३ या क्षेत्रावर संबंधित विकासक यांनी २५२० ब्रास उत्खनन केल्याचे आढळून आल्याने तहसिलदार, हवेली यांनी संबंधित विकासक यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये दिनांक १३.०६.२०२३ रोजी नोटीस बजाविण्यात आली असून त्यानुषंगाने तहसिलदार, हवेली यांच्याकडून कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.